MHKO100002222018 **नियमीत दिवाणी दावा क्र. ३९/२०१८**

इंदीरा पुजारी वगैरे.
/वि/
जयवंत कांबळे वगैरे.

## निशाणी क्र. ७२ वर आदेश

वादी यांनी प्रस्तुतच्या अर्जाद्वारे प्रतिवादी क्र.१०-अ यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला उशिर माफ होणेसाठी व दावा अवसानाचा (अबेटमेंट) आदेश रद्द होऊन मिळणेसाठी विनंती केलेली आहे. प्रतिवादींतर्फे अर्जाचे मागील पानावर म्हणणे दाखल केले. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

०२. प्रकरणाचे अवलोकन केले. वादी यांनी सदरचा दावा हा वाटप व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शणास येत आहे की, प्रतिवादी क्र.१०-अ अनुसया कलाप्पा मतवाडे उर्फ मत्तीवडे हया दिनांक १५/०७/२०२२ रोजी मयत झालेल्या आहेत व प्रस्तुतचा अर्ज हा दिनांक २४/०१/२०२४ रोजी दाखल केलेला आहे. मुदतीचे अधिनियम १९६३ चे आर्टीकल १२० प्रमाणे वादीने, प्रतिवादीच्या मृत्युच्या तारखेपासून ९० दिवसांमध्ये वारस अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. तसेच, मुदतीत वारस अभिलेखावर न घेतल्यास आदेश २२, नियम ४ प्रमाणे तो दावा मयत प्रतिवादीविरुध्द दावा अवसान (Abate) होतो. आदेश २२, नियम ४ (५) (ब) प्रमाणे वादी उशिराबाबत संयुक्त कारण दाखवत असेल तर न्यायालयाला विलंब माफ करुन वारस अभिलेखावर घेण्याची परवानगी देता येईल.

०३. त्याप्रमाणे प्रस्तुत दाव्याचे अवलोकन केले असता, वादी यांना बराच विलंब झालेला आहे. त्याबाबत वादी यांनी मुदतीचे अधिनियम १९६३ चे कलम ५ प्रमाणे संयुक्त कारण दिलेले आहे का हे पाहणे गरजेचे आहे. वादी यांचे असे कथन आहे की, वादी क्र.१ ते ३ तर्फे वटमुखत्यार हे बेळगांवी येथे परराज्यात राहणेस असुन त्यांचा तेथे हॅाटेल व्यवसाय असलेने ते व्यवसायाचे ठिकाणी सतत गुंतून असतात. तसेच, दरम्यानचे काळात ते काही दिवस आजारी होते. तसेच, काही दिवस त्यांची आईदेखील आजारी होती व त्यांना दवाखान्यात ने-आण करणेसाठी त्यांचे घरी अन्य कोणीही नव्हते. त्यामुळे, त्यांना वेळेत आपल्या वकीलांची भेट घेऊन मयताचे वारस मुदतीत अभिलेखावर आणता

आले नाहीत. तसेच, वादी यांना मयताचे वारस मुदतीत अभिलेखावर आणावे लागतात याचे कायदेशीर ज्ञान नव्हते. त्यामुळे, त्यांना वारस अभिलेखावर आणणेसाठी विलंब झालेला आहे असे कारण नमुद केलेले आहे. सदर कारण व विलंबाचा काळ पाहता वादी यांनी अर्जात नमुद केलेले कारण हे संयुक्तीक होत नाही. परंतु, दाव्याचे स्वरुप पाहता प्रकरणाची गुणदोषावर निर्गती करण्याकरीता प्रतिवादी क्र.१०-अ यांचे वारस अभिलेखावर आणणे आवश्यक आहे. त्यामुळे, त्यांना अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ करणे व अबेटमेंटचा आदेश रद्द करणे आवश्यक आहे. अर्ज दाखल करण्यास झालेल्या विलंबाबाबत वादी यांचेवर अर्जाचा खर्च ठेवून त्याची भरपाई प्रतिवादी यांना देणे योग्य होईल. सबब, मी पुढील आदेश पारीत करत आहे.

## आदेश

०१. अर्ज रक्कम रु.१,०००/- (रुपये एक हजार फक्त) च्या खर्चासह मंजुर करण्यात येत आहेत.

०२. प्रतिवादी क्र.१०-अ अनुसया कलाप्पा मतवाडे उर्फ मत्तीवडे यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ करुन दावा अवसानचा (अबेटमेंट) आदेश रद्द करण्यात येत आहे.

( खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला )

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by
SACHIN
DURGASHANKAR MEHTA
Date: 2025.08.22 16:39:25
+0530

**( एस. डी. मेहता )**
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
गडहिंग्लज.

गडहिंग्लज.
दिनांकः २२/०८/२०२५.